# ब्रिटीश कालीन भारतातील सामाजिक, धार्मिक सुधारणा चळवळींचे ऐतिहासिक योगदान

**प्रा. नरेंद्र व्ही. झाडे**
श्री. गोविंदप्रभू कला व वाणिज्य महाविद्यालय तळोधी, बाळापूर,
ता. नागभीड, जि. चंद्रपूर
मो. नं. ९९२३९८७८२१

---

**प्रस्तावना :**

ब्रिटीश शासनाच्या स्थापनेमुळे भारतात व्यापक व मूलभूत रूपात राजनितिक प्रशासनिक व वैधानिक एकीकरणाची प्रक्रिया प्रारंभ झाली. भारतीय इतिहासात असे पहिल्यांदा घडले. ब्रिटीश शासनाने भारतीय लोकांत सामुहिक चेतनेचा संचार केला व त्यांना आपल्या सामान्य हित व सुख दुःखाच्या प्रती सजग बनवले. १७५७ ते १८५३ पर्यंत सामाजिक परिवर्तन स्पष्टत: दिसू लागले व त्याची गती तेज झाली. या कालावधीत भारतातील विभिन्न प्रदेशात आपसात संपर्क वाढला. त्यामुळे सामाजिक समुहाची जुनी धार्मिक व्यवस्था विघटित झाली. जाती प्रथांमध्ये शिथिलता आली व पारंपरिक ग्रामीण अर्थव्यवस्थेने आत्मनिर्भरता व वेगळे राहण्याची आपली प्राचीन परंपरा सोडून दिली.

**ब्राम्हो समाज :**

राजाराममोहन रॉय यांनी १८२८ मध्ये ब्राम्हो समाजाची स्थापना केली. ईश्वराच्या एकत्वावर विश्वास ठेवणाऱ्या आणि मूर्ती पूजेचा त्याग करणाऱ्या लोकांकरिता हा ब्राम्हो समाज स्थापन करण्यात आला. राजाराममोहन रॉयच्या मृत्यूनंतर सक्रीय नेतृत्वाच्या अभावामुळे काही काळपर्यंत ब्राम्हो समाजाच्या कार्यामध्ये शिथिलता आली. महर्षी द्वारकानाथ टैगोर आणि पंडित रामचंद्र विद्यावागीश जे राजारामचे शिष्य होते, त्यांनी दहा वर्षांपर्यंत याचे संचालन केले. त्यानंतर द्वारकानाथचा मोठा मुलगा देवेंद्रनाथ टागोर यांच्या रूपाने एक नेता या संघटनेला मिळाला. ब्राम्हो समाजामध्ये येण्यापूर्वी धार्मिक सत्याचा शोध करण्याच्या उद्देशाने देवेंद्रनाथ टैगोर यांनी कलकत्ता येथे 'तत्त्वरंजिनी सभे'ची स्थापना केली. या संघटनेलाच पुढे 'तत्त्वबोधिनी' सभा म्हणून ओळखल्या जाई. देवेंद्रनाथने आपल्या वीस सहकार्यांसोबत २१ डिसेंबर १८४३ रोजी ब्राम्हो समाजाची सदस्यता ग्रहण केली. राजाराममोहन रॉयच्या धार्मिक उद्देशाच्या पुर्तीसाठी अथक प्रयत्न केले. १८५७ मध्ये केशवचंद्र सेनने ब्राम्हो समाजाची सदस्यता ग्रहण केली आणि पूर्णकालीन प्रचारक बनले. त्यांनीच ब्राम्हो समाजाला अखिल भारतीय स्तरावर नेऊन पोहोचविले.

**प्रार्थना समाज :**

केशवचंद्र सेनेच्या महाराष्ट्र यात्रेमुळे १८६७ मध्ये प्रार्थना समाजाची स्थापना झाली. या संघटनेचे संस्थापक

डॉ. आत्माराम पांडुरंग आणि महादेव गोविंद रानडे हे होते. आर. सी. भांडारकर सुद्धा या संघटनेचे एक प्रमुख नेता होते. प्रार्थना आणि सामाजिक सुधारणा हे या समाजाचे दोन मुख्य भाग होते. रानडे यांनी वाईट प्रथा, स्त्रियांची गुलामी, बालविवाह, विधवा पुनर्विवाहाला विरोध, स्त्रियांचे अज्ञान, विदेशी यात्रांचा निषेध, जाती जातींमधील खाने यावरील बंधने, अश्पृश्यता इत्यादी गोष्टींचा निषेध केला.

**आर्य समाज :**

उत्तर भारतामध्ये दयानंद सरस्वती द्वारा स्थापित आर्य समाजाची चळवळ होती. त्याला मोठ्या प्रमाणात समर्थन प्राप्त होते. १८२४ मध्ये गुजरात मधील मोर्वी गावात मुलशंकरचा जन्म झाला. पुढे हेच मुलशंकर बालक दयानंद सरस्वती या नावाने प्रसिद्ध झाले. त्यांनी अविवाहित राहणे, मनाची अशांती दूर करणे व ज्ञानाच्या शोधाकरिता गृहत्याग केला. ते १५ वर्षांपर्यंत ज्ञानाच्या शोधात भटकत राहिले. शेवटी नेत्रहीन गुरू स्वामी विरजानंदचे शिष्यत्व पत्करून ज्ञान प्राप्त केले. स्वामी विरजानंदकडूनच त्यांनी वेदाच्या दार्शनिक व्याख्यांचा परिचय करुन घेतला. स्वामीजींनी हिंदू धर्मातील वाईट प्रथा व दोष नष्ट करण्याच्या कार्याचे शिष्य दयानंद कडून गुरुदक्षिणेमध्ये वचन घेतले. ज्याचा महर्षी दयानंद यांनी जीवनाच्या अंतापर्यंत पालन केले. वेदाचा व भारतीय दर्शनाचा अभ्यास केल्यानंतर स्वामी दयानंद आर्य श्रेष्ठ लोक होते. वेद ईश्वरीय ज्ञान व भारतभूमी विशिष्ट भूमी आहे. या निष्कर्षापर्यंत पोहोचले. या आधारावर १८७५ मध्ये मुंबईला आर्य समाजाची स्थापना केली. काही वर्षांनंतर आर्य समाजाचे मुख्यालय लाहोरमध्ये स्थापित केल्या गेले. स्वामी दयानंद यांनी वेदाचा अनुवाद केला. दयानंद सरस्वती वेदाला भारताचे आधारस्तंभ समजत. त्यांचा विश्वास हिंदू धर्म आणि वेदावर होता. शाश्वत, अपरिवर्तनीय, धर्मातील व दैवीय वेद आहेत असा त्यांचा समज होता. म्हणून त्यांनी वेदाकडे वापस चला आणि वेद हेच समग्र सत्यज्ञानाची एक मात्र पुस्तक मानत असत. त्यांनी इसाई व इस्लाम धर्माच्या तत्त्वावर मोठ्या प्रमाणात टिका केली.

**रामकृष्ण मिशन :**

रामकृष्ण परमहंस यांनी १८८७ मध्ये रामकृष्ण मठाची स्थापना केली. रामकृष्ण परमहंस तत्त्वज्ञानी संत होते. ते दक्षिणेश्वर मंदिरात राहून उपासना करीत. ते सामान्य जनतेचे प्रेरणा आणि भक्ती भावनेचे स्त्रोत होते. तसेच पाश्चात्य संस्कृतीत रंगलेल्या अभिजात मध्यमवर्गाचे आकर्षणाचे केंद्र होते. ते अतिनम्र, मानवतावादी व आध्यात्मिक सत्यनिष्ठेने अभिभूत होते. त्यांनी सर्व धर्माच्या पूजाविधींमध्ये एकच ईश्वर असल्याचा शोध लावला. त्यांनी वेदांत दर्शन आणि उपनिषदाकडून धार्मिक प्रेरणा ग्रहण केली. तरीपण सर्व धर्माच्या ईश्वर प्राप्तीच्या वेगवेगळया मार्गाला मान्यता दिली. कारण या सर्व मार्गांचा उद्देश परमेश्वर प्राप्तीचाच आहे. त्यांनी कुराण, बायबल, गुरुग्रंथ साहेब यांना पवित्र ग्रंथ मानित आपल्या समाधीच्या अवस्थेत देवी कालीमाता, कृष्ण, ईसामसिहा व बुद्धाचे दर्शन करीत. १८८६ मध्ये रामकृष्णाच्या मृत्यूनंतर विवेकानंद यांनी या संघटनेची धुरा सांभाळली. १८९३ मध्ये ते अमेरिकेतील शिकागो येथिल विश्वधर्म संमेलनात भाग घेतला. त्यानंतर त्यांनी वेदांत सभा स्थापित केली. कलकत्ता जवळील वेलूर व अल्मोडा यांच्या जवळ मायावती येथे दोन केंद्रांची स्थापना केली. येथे मिशनसाठी काम करणाऱ्या व्यक्तीला सदस्यता देऊन धार्मिक व सामाजिक कार्यासाठी संन्यासी म्हणून प्रशिक्षित केले. रामकृष्ण मिशन ने विद्यालय व लोकोपयोगी केंद्रांची स्थापना केली. विवेकानंदाचा सर्व धर्मातील एकता व समानता यावर विश्वास

होता. त्यामुळे एका धर्मातून दुसऱ्या धर्मात धर्म परिवर्तन करण्याला त्यांचा विरोध होता. त्यांच्या मते जर तुमचा जन्म मुस्लिम धर्मात झाला असेल तर चांगला मुस्लिम बना. 'प्रबुद्ध भारत' आणि 'उद्बोधन' या नियंत्रकालीकांमार्फत त्यांनी हिंदू धर्माचा प्रसार केला.

**थियॉसाफिकल सोसायटी :**

१८७५ मध्ये मॅडम ब्लावत्स्की व कर्नल ऑलकॉटने न्युयार्कमध्ये थियॉसाफिकल सोसायटीची स्थापना केली. १८७९ मध्ये हे भारतात आले व मद्रास जवळ आडयारमध्ये सोसायटीचे मुख्यालय स्थापन केले. १८८८ मध्ये श्रीमती ऍनी बेंझेंट या सोसायटीच्या सदस्य बनल्या. या सोसायटीची निर्मिती सर्व धर्माचा तुलनात्मक अभ्यास करण्याच्या उद्देशाने केला गेला. परंतु यांनी प्राचीन हिंदू धर्माला जगातील अत्याधिक रहस्यमयी आणि अध्यात्मिक धर्म मानले. थियासॉफी (ब्रम्हविद्या) हिंदू धर्माच्या अध्यात्मिक दर्शन, त्यांचे कर्म सिद्धांत व आत्म्याच्या पुनर्जन्माच्या सिद्धांताचे समर्थन करीत होती. थियॉसाफिकल सोसायटीची धारणा, धर्म, दर्शन व तंत्रमंत्र यांचे अपूर्ण मिश्रण होते. हे जाती, प्रजाती, संप्रदाय व लिंगभेदाचा विचार न करता मनुष्याच्या सार्वभौमिक बंधुत्वाचा प्रचार करीत होती. यांनी भारतीयांमध्ये राष्ट्रीय गौरवाच्या भावनेचा विकास केला. थियॉसाफिकल सोसायटीने शिक्षण क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले. १८८९ मध्ये वाराणसी येथे 'सेंट्रल हिंदू कॉलेज' स्थापन केले. सोसायटीचे युवक, महिला आणि दलितांसाठी विद्यालय काढले. सोसायटीने बालविवाहाचा विरोध केला. जाती प्रथा समाप्त करणे, अस्पृश्याचे उत्थान व विधवांच्या स्थितीत सुधारणा आणण्याला समर्थन दिले.

**महात्मा ज्योतिबा फुले व सत्यशोधक :**

ज्योतिबा फुले यांचा जन्म १८२८ मध्ये एका माळी कुटुंबात झाला. त्यांनी शक्तिशाली गैरब्राम्हण चळवळीचे संचालन केले. त्यांचे शिक्षण वैयक्तिक अनुभव आणि इसाई धर्म प्रचारकांच्या सानिध्यामुळे त्यांना प्रचलित हिंदू धर्म आणि त्यांच्या प्रथा यांचे टिकाकार बनवले. १८४८ मध्ये मुलींची व १८५४ मध्ये अस्पृश्यांसाठी विद्यालयाची स्थापना व विधवांच्या सहाय्यतेसाठी खाजगी अनाथालय सुरू केले. ज्योतिबा फुलेंना ब्राम्हणाच्या पुरोहितशाहीची खूप घृणा होती. ते गैरब्राम्हण व अस्पृश्यांमध्ये कोणतेच भेद करत नव्हते. गरिबाचे ते कट्टर पक्षधर होते. जेव्हा यार्कड्युकला भेटले, तेव्हा गरीब शेतकऱ्याच्या वेशामध्ये जाऊन वास्तविक स्थितीबद्दल त्यांना अवगत केले. दलित व ब्राम्हणेत्तर वर्गांना शिक्षित करून त्यांना स्वतंत्र करणे, त्यांना आपल्या अधिकाराप्रती जागरूक बनविण्यासाठी १८७३ मध्ये त्यांनी 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. आपल्या ब्राम्हण विरोधी चळवळीला संघटित रूपात प्रसार करण्यासाठी त्यांनी 'गुलामगिरी' व 'सार्वजनिक सत्यधर्म' ही दोन पुस्तके लिहिली. स्त्रियांच्या शाळेकरिता स्त्री शिक्षक मिळत नसल्यामुळे ज्योतिबांनी आपली पत्नी सावित्रीबाईंना घरी शिक्षण देऊन शिक्षिका म्हणून आपल्या शाळेत कार्य करण्यास लावले. तसेच त्यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' व 'इशारा' ही पुस्तके लिहिली. तसेच आपल्या विचाराचा प्रचार प्रसार करण्यासाठी त्यांनी 'दीनबंधू' नावाचे वर्तमानपत्र सुरू केले.

**महर्षी शिंदे :**

विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म जमाखिंडी या गावात झाला. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन

कॉलेजात झाले. समाजातील भेद, अन्याय, पिळवणूक पाहून शिंदे यांचे मन दुखी झाले आणि या समाजाचा उद्धार आपण केला पाहिजे असे त्यांच्या मनाने निश्चय केला. अस्पृश्यांच्या उद्धाराकरिता त्यांनी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी मुंबई येथे 'डिप्रेस्ड क्लास मिशन' ही संस्था स्थापन केली. या संस्थेतर्फे शिंदे यांनी प्राथमिक शाळा, वसतीगृह, दवाखाने, हायस्कुल अस्पृश्यांकरिता चालविल्या. त्यांची बहीन जानकीबाई हीने सरकारी नोकरी सोडून या मिशनच्या शाळेत नोकरी पत्करली. शिंदे यांनी त्यानंतर अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण संघाची स्थापना केली. महाराष्ट्रात मुरळी आणि देवदासी प्रथा होती. ती चाल नष्ट करण्याकरिता शिंदे यांनी राजकीय चळवळीत सुद्धा भाग घेतला. महात्मा गांधीजींच्या कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला. वृद्धत्वामुळे त्यांनी १५ एप्रिल १९२३ रोजी 'डिप्रेस्ड क्लास मिशन'ची सुत्रे योग्य नेतृत्वाच्या हाती सोपवून ते निवृत्त झाले. २ जानेवारी १९४४ रोजी त्यांचे निधन झाले.

**अरविंद घोष :**

अरविंद घोष प्रमुख बंगाली क्रांतिकारक होते. जे नंततर योगी बनले. जवळपास १३ वर्षे आपल्या शिक्षणासाठी ते इंग्लंडला राहिले. ते १० वर्षेपर्यंत बंगालच्या फाळणी दरम्यान राजनितिक क्षेत्रात सक्रीय होते. ते स्वदेशी व बहिष्कार कार्यक्रमाचा पुरस्कार करण्यात समाविष्ट होते. त्यांनी राजनितिक स्वतंत्रता आपल्या राष्ट्राचा जीवन व प्राण आहे असे विचार व्यक्त केले. आणि इंग्रजी भांडवलशाही स्वशासनाला राजनितिक राक्षसपण अशी उपमा दिली. १९०८-०९ मध्ये सरकारने माणिकतल्ला बॉम्ब षडयंत्रामध्ये फसवून एक वर्षाची कैद केली. नंतर त्यांना सोडून दिले. १९१० मध्ये ते पांडिचेरीला निघून गेले. तेथेच त्यांनी आपले जीवन अध्यात्मिक कार्यामध्ये व्यतीत केले. अरविंद घोष यांनी आय.सी.एस. ची परीक्षा उत्तीर्ण केली होती. त्यांचा जन्म १५ ऑगस्ट १८७२ रोजी कलकत्ता येथे झाला. त्यांनी 'आर्य' नावाचे मासिक काढले. 'द लाईफ डिव्हाईन', 'द फाउंडेशन ऑफ इंडियन कल्चर', 'द सिंथेसिस ऑफ योग', 'एसेज ऑन दी गीता' हे ग्रंथ लिहिले. त्यांनी 'सावित्री' हे महाकाव्य लिहिले.

**रविंद्रनाथ टागोर :**

रविंद्रनाथ टागोरचा जन्म कलकत्तामध्ये फिराली नावाच्या ठाकूर कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव देवेंद्रनाथ तर आईचे नाव शारदा देवी होते. त्यांचे कुटुंब सरंजामदार होते. त्यांना काव्य, संगित, नृत्य यांची आवड लहानपणापासूनच होती. त्यांचे शिक्षण मातृभाषेतूनच झाले. रविंद्रनाथचा विवाह भवताराणी या मुलीशी झाला. तिचे नाव नंतर मृणालिनी ठेवण्यात आले. आपल्या जीवनात रविंद्रनाथ यांनी सामाजिक, वैचारिक आणि साहित्यिक चळवळींशी सतत संबंध ठेवला. शांतीनिकेतन येथे रविंद्रनाथ यांनी उपनिषदांच्या काळात जसे निसर्ग सानिध्यात शिक्षण देण्यात येत होते तसे शिक्षण देण्यासाठी आश्रम शाळेची स्थापना केली. टागोरांनी 'गितांजली' हा काव्यसंग्रह, 'नौकाडुबी', 'गौरा' ह्या कादंबऱ्या, 'चित्रगंध्दा', 'परिशोध', 'श्याम' ही नाटके, 'ताशेरदेश' हे संगित नाटक लिहिले. 'गितांजली' या काव्यसंग्रहाला १३ नोव्हेंबर १९१३ रोजी स्विडीश अकादमीने नोबल पारितोषिक प्रदान केले.

**लोकहितवादी :**

गोपाळ हरी देशमुख हे पश्चिम भारतातील महान समाज सुधारक होते. त्यांनी मराठी मासिक पत्रिका

'लोकहितवादी'चे संपादन केले. त्यांनी विधवा पुनर्विवाह, महिलांची सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले. बालविवाह, जातीप्रथा आणि दासत्वाची निंदा केली. त्यांनी अहमदाबादमध्ये 'पुनर्विवाह मंडळा'ची सुरुवात केली. लोकहितवादींनी मुंबईवरून 'इंदूप्रकाश', पुण्यावरून 'ज्ञानप्रकाश' या मराठी वृत्तपत्राच्या प्रकाशनामध्ये सहभाग दिला होता. संसदीय राज्यपद्धती भारताकरिता आदर्श आहे असे त्यांचे मत होते. जाती निरपेक्ष आणि वर्ग निरपेक्ष लोकशाहीचा विकास होईपर्यंत इंग्रजांचे राज्य भारतात राहावे असे त्यांचे स्पष्ट मत होते.

**महर्षी धोंडो केशव कर्वे :**

महर्षी कर्वे यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ रोजी कोकणात रोखली या गावी झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अण्णासाहेब कार्वे यांनी १८८७ मध्ये एम. ए. ची पदवी मिळविली. कर्वे समाजसुधारक, सामाजिक कार्यकर्ता आणि शिक्षणशास्त्री होते. त्यांनी आपले संपूर्ण जीवन विधवांच्या उत्थान आणि स्त्री शिक्षणाच्या प्रसाराकरिता समर्पित केले. १८९३ मध्ये 'विधवा विवाहोत्तेजक मंडळ' बनविले. जे विधवांचे पुनर्विवाह, त्यांच्या मुलांची सहाय्यकता व शिक्षणाची देखरेख करी. १८९५ मध्ये या संस्थेचे नाव बदलून 'विधवा विवाह प्रतिबंधक निवारक मंडळ' असे ठेवण्यात आले १८९८ मध्ये पुण्यामध्ये 'महिलाश्रम' सुरू केले. १९०७ मध्ये महिला विद्यालय सुरू केले. तसेच दुसऱ्या वर्षी त्यांनी 'निष्काम कर्म मठ' सुरू केले. तिथे विधवागृह व महिला विद्यालयाच्या कार्यकर्त्याला प्रशिक्ति करण्याची व्यवस्था केली. १९१६ मध्ये त्यांनी भारतीय महिला विश्वविद्यालयाची स्थापना केली. १९४४ मध्ये त्यांनी समता संघ किंवा मानव समता संवर्धन सभेची स्थापना केली. त्यांनी स्त्रियांची स्वतंत्रता, सामाजिक समता, जातीनिष्ठीत समाज आणि राष्ट्रीय शिक्षणाचे समर्थन केले. त्यांना १९५८ मध्ये भारतरत्न प्रदान करण्यात आले. अण्णासाहेबांनी पंडीता रमाबाईच्या शारदाश्रमातील आनंदीबाई या विधवेशी स्वतः विवाह केला.

**गोपाळ गणेश आगरकर :**

गोपाळ गणेश आगरकर पत्रकार, समाजसुधारक व महान राष्ट्रवादी होते. त्यांनी 'मराठा' व 'केसरी'चे संपादक पद सुद्धा सांभाळले होते. १८८८ मध्ये आपल्या समाज सुधारणेच्या विचाराला लोकप्रिय बनविण्यासाठी 'सुधारक' नावाचे साप्ताहिक पत्र काढणे सुरू केले. त्यांनी जातीपाती व अस्पृश्यत्वाची निंदा केली. मुलामुलींच्या विवाहाचे वय वाढविण्यासाठी संघर्ष केला. त्यांनी टिळक, रानडे व त्या काळातील इतर समाजसुधारकांसोबत कार्य केले.

**छत्रपती शाहू महाराज :**

शाहू महाराज कोल्हापूर संस्थानाचे राजे होते. भारतातील सत्ताधारी राजांमध्ये सर्वात पहिले शासक होते. त्यांनी मागासवर्गीयांच्या सामाजिक आणि धार्मिक सुधारणांमध्ये रुची दाखविली. त्यांनी जाती बंधनाच्या शृंखला तोडण्याचा खूप प्रयत्न केला. जातीभेदाचा विचार न करता सर्वांसाठी शिक्षण आणि सरकारी नोकरीचे दार खुले करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी बालविवाहावर प्रतिबंध लावले. विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन देण्याचे कार्य केले. त्यांचे उल्लेखनीय कार्य शिक्षण क्षेत्रामध्ये होते. त्यांनी कोल्हापूरमध्ये नि:शुल्क शिक्षण देणारे विद्यालय सुरू केले. गरिबांच्या मुलांना राहण्यासाठी नि:शुल्क वसतीगृहाचे निर्माण केले. ते पाश्चात्य उदारवादी शिक्षणाचे पक्षधर होते.

ते गैरब्राम्हण वर्गाच्या समस्याचे पूर्ण जाणकार होते. भारतीय राजांमध्ये ते पहिले व्यक्ती होते की, ज्यांनी आपल्या राज्यात अस्पृश्यतेवर बंधन लावण्याचे साहस केले. शाहू महाराजांनी १९०२ मध्ये आपल्या वाढदिवशी मागासलेल्या जातींना ५० टक्के आरक्षण देण्याचे धोरण सुरू केले. म्हणूनच त्यांना आरक्षणाची जनक म्हटले जाते.

**बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर :**

बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा उद्देश अस्पृश्यांना भारतीय समाजातील आधुनिक अंगाच्या रूपात संघटित करणे हा होता. कारण ते शैक्षणिक आधार घेऊन राजनितिक अधिकार आणि कायद्याचा प्रयोग करून गलिच्छ कामे सोडून चांगले जीवनमान प्राप्त करू शकतील. अस्पृश्यावर होणाऱ्या सवर्णांच्या सर्व प्रतिबंधाला व अत्याचाराला तोंड देण्यास सक्षम बनविण्यासाठी आंदोलन सुरू केले. तसेच त्यांनी वेगळ्या मतदार संघाची मागणी केली. मनुस्मृतीला जाडून टाकले, मंदीर प्रवेशासाठी आंदोलन केले. त्यांनी महाराष्ट्रात १९२० च्या दशकात बऱ्याच मोठ्या प्रमाणात अस्पृश्यता आंदोलनाचे सुत्रपाठ केले. जे आजही बऱ्याच प्रमाणात क्रियाशील आहे. १९२४ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बहिष्कृत हितकारणी सभे'ची स्थापना केली. १९२७ ला मराठी पाक्षिक बहिष्कृत भारतचे प्रकाशन सुरू केले. तसेच समाज समता संघाची स्थापना केली. मजूर लोकांच्या हिताच्या रक्षणासाठी त्यांनी धर्मनिरपेक्ष पद्धतीवर 'स्वतंत्र मजूर पार्टी'ची स्थापना केली. डिसेंबर १९२७ मध्ये त्यांनी सार्वजनिक विहिरी व तलावावर पाणी भरण्याच्या अस्पृश्यांच्या अधिकारांना सुनिश्चित करण्यासाठी महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. त्यांनी १९२८ मध्ये पार्वती मंदीर सत्याग्रह केला. १९३०-३५ मध्ये काळाराम मंदीर सत्याग्रहाच्या मंदीर प्रवेश आंदोलनाचे संयोजक केले. १९३०-३१ च्या गोलमेज संमेलनाच्या अगोदरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितांसाठी सर्वमान्य नेता झाले होते. त्यांनी दलितांसाठी संविधानाद्वारा आरक्षणाच्या व्यवस्थेची मागणी केली. तसेच दलितांसाठी वेगळ्या मतदार संघाची मागणी केली.

**पारसी समाजातील सुधारणा :**

पारसी जमातीत सुद्धा समाजसुधारकांचा उदय झालेला होता. १८५१ मध्ये पारसी जमातीत धार्मिक सुधारणा समिती स्थापन करण्यात आली. बी. एम. मलवारी आणि के. आर. कामा यांनी पारसी जमातीत शिक्षणाच्या प्रसारासाठी आटोकाट प्रयत्न केला. महिला व मुलांच्या कल्याणासाठी बहरामजी यांनी सेवासदन स्थापन केले. पारसी धर्मात व समाजात सुधारणा करण्यासाठी १९१० मध्ये 'सोरोस्ट्रीयन सभा' अस्तित्वात आली. काळाचे महत्त्व ओळखून पारसी समाजाने पाश्चिमात्य शिक्षणाचा अवलंब केला व समाजात शिघ्रगतीने सुधारणा घडवून आणल्या. पारसी समाजातील दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, दिनशा वाच्छा, जमशेदजी टाटा यांनी देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय विकासात मोलाची कामगिरी केली.

**शीख समाज :**

शीख समाजातील नामधारी आंदोलन हे कुका आंदोलनाची एक शाखा होती. यांची नेतृत्व बाबा रामसिंह आणि त्यांचा शिष्य बालिकसिंह यांनी चालविले. त्यांनी आपल्या अनुयायांना साधे, सरळ जीवन जगणे व ईश्वरावर विश्वास ठेवणे व समस्त कर्मकांडाची तिरस्कार करण्याचा उपदेश दिला. रामसिंह नामधारी आंदोलनाची स्थापना

गुरू गोविंदसिंहांनी खालसा पंथाची केली तशीच केली. निरंकारी आंदोलनाची स्थापना बाबा दयालदास यांनी केली. त्यांनी निराकार ईश्वराच्या पूजेवर भर दिला. त्यांनी ज्योतीष्य, जन्मपत्रिकेवर विश्वास न कर,णे मांस भक्षण, मद्यपान, असत्य, धोकेबाजी, जनांमध्ये बेईमानी इत्यादी गोष्टींचा निषेध केला.

सिंह सभाची स्थापना ठाकूरसिंह संघावालिया आणि ज्ञानीज्ञानसिंह यांच्या नेतृत्वात प्रमुख शिखांच्या छोट्या समुदायाने केली. त्यांचे मुख्य लक्ष होते की, शीख धर्माला त्यांच्या मौलिक शुद्ध रूपात पुर्नस्थापित करणे. ऐतिहासिक, धार्मिक पुस्तके आणि पत्रिकांचे प्रकाशन करणे, पंजाबी भाषेच्या माध्यमातून ज्ञानाचा विस्तार करणे, धर्मभ्रष्ट शिखांना धर्माच्या रस्त्यावर वापस आणणे, शिखांच्या शैक्षणिक कार्यक्रमात इंग्रजीला समाजनिष्ठ केले. त्यांनी गुरुमत ग्रंथ प्रचारक सभेची स्थापना केली. १८८० मध्ये अमृतसर येथे सिंह सभाच्या सर्वोच्च संघटना खालसा दिवानची स्थापना केली. १९०५ मध्ये शीख धर्म सुधारकांनी स्वर्ण मंदिरावरील ब्राम्हण पुरोहित, मूर्ती आणि हिंदू कर्मकांडापासून मुक्त केले. १९२० मध्ये गुरुद्वाराचे नियंत्रण करण्यासाठी शिरोमणी गुरद्वारा प्रबंधक कमेटीची स्थापना करून तिला निर्वाचित समिती बनविले. पुढे या आंदोलनाने अकाली आंदोलनाचे रूप धारण केले. त्यानंतर उदारवादी, राष्ट्रवादी सुधारक, ब्रिटीश सरकार समर्थक आणि सांप्रदायीकवादी राजनितिक मंचामध्ये विभाजित झाले.

**मुसलमान समाज :**

भारताच्या राजनितिक सत्तेवर मध्यकाळापासून मुस्लिम शासकाची सत्ता होती. परंतु १७०७ ला औरंगजेबच्या मृत्यूनंतर मराठे, जाट, शीख इत्यादी समुहाने त्यांच्या सत्तेच्या आधार काढून टाकला. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रज लोकांनी मोगल साम्राज्याच्या आर्थिक व राजनितिक प्रभुत्वाला पूर्णपणे नष्ट केले. १८५७ च्या विद्रोहामुळे ब्रिटीश सरकारद्वारा अवलंब केल्या गेलेल्या नितीमुळे भारतीय मुसलमानांची स्थिती बरीच खालावली गेली. मुस्लिम लोक इंग्रजांद्वारा प्रारंभ केलेल्या पाश्चात शिक्षणाच्या प्रभावापासून दूर राहू लागले व परंपरागत इस्लामचा कट्टरपणे अवलंब करू लागले. परिणामतः भारतीय मुसलमान अजून अधिक दरिद्री बनू लागले. मुस्लिम समाजात सुधार करण्यासाठी काही आंदोलन सुरू करण्यात आले. आधुनिक पश्चिम बंगालमध्ये ‘तीतूमीर’ नावानी प्रसिद्ध आंदोलन मीरमिथार अल्ली द्वारा चालविले गेले. त्यांनी कारखानदारांविरुद्ध मुसलमान शेतकऱ्यांना संघटित केले. याच काळात पूर्व बंगालमध्ये रूढीवादी इस्लामी सुधारणावादी ‘फरैजी’ आंदोलनाचा उदय झाला. हे आंदोलन इस्लाम धर्माच्या मूळ सिद्धांतावर भर देत होते. १८३९ मध्ये करामत अली जौनपुरीच्या नेतृत्वात ‘तायुनी आंदोलन’ सुरू केले. ते दोन वर्षपर्यंत चालले. या आंदोलनानंतर सर सैय्यद अहमद खाँ च्या नेतृत्वात अलिगढ आंदोलन सुरू झाले. त्यांनी स्पष्ट दृष्टी, असाधारण दृढ संकल्प व रुढीवादी उलेमाच्या खुल्या विरोधाला व आपल्या काही मित्रांच्या टिकेला झुगारुन देऊन सुधारणावादी दिशेने आपले प्रयत्न सुरू केले. त्यांनी १८७० मध्ये तहजीब-अल-अखलाख नावाच्या मुख्यपत्रातून आपले विचार व भूमिका जनतेसमोर मांडली. त्यांनी ब्रिटीश नोकरशहाच्या सहकार्याने २४ मे १८७५ मध्ये अलिगढ विद्यालयाची स्थापना केली. १८७७ मध्ये त्याला महाविद्यालयाचे रूप देऊन त्याचे नाव मोहम्मउल ऍंग्लो ओरिएंटल कॉलेज ठेवण्यात आले. पुढे चालून हेच अलिगढ मुस्लिम विश्वविद्यालय बनले. १८८९ मध्ये मिर्जा गुलाम अहमद यांनी अहमादिया आंदोलन सुरू केले.

**राधास्वामी सत्संग :**

राधास्वामी सत्संगची स्थापना १८६१ ला आग्रा येथे झाली. ती आग्राच्या महाजन तुलसीराम यांनी केली. ते शिवदयाल साहेब व स्वामी महाराज नावांनी प्रसिद्ध होते. राधास्वामी संप्रदायाचे अनुयायी सर्वोच्च ईश्वर पवित्र लोकांची संगत (सत्संग) आणि पवित्र सामाजिक जीवन पद्धती यावर विश्वास ठेवत होते. त्यांचा विश्वास होता की, अध्यात्मिक उन्नतीसाठी भौतिक जीवनाचा परित्याग करण्याची आवश्यकता नाही. त्यांची मान्यता होती की, सारे धर्म सत्य व खरे आहे. हे संप्रदाय कोणत्याही मंदीर आणि पूजा स्थळाला मान्यता देत नसत. ईश्वराप्रती आस्था, दान कार्य, सेवाभाव, ईश्वर भक्ती आणि प्रार्थना यांनाच आवश्यक कर्तव्य मानित.

**निष्कर्ष :**

प्राचीन वर्गामध्ये विभाजित भारतीय समाजामध्ये नवीन वर्गाचा उदय झाला. यामध्ये आर्थिक, शैक्षणिक, नोकरीपेक्षा व व्यावसायिक होते. या नवीन वर्गाला मध्यमवर्ग असे नाव दिल्या गेले. आर्थिक व राजनितिक परिवर्तनामुळे भारतीय लोकात एकतेची वाढ झाली. सडक, रेल्वे, डाकघर आणि संचार साधनांच्या प्रसारामुळे भारतातील विभिन्न प्रदेश एक दुसऱ्यांच्या परस्पर संपर्कात आले. परंपरागत धार्मिक, नैतिक आणि सौंदर्यवादी वैचारिक मुल्यव्यवस्थेला ही परिस्थिती एक प्रतिस्पर्धी म्हणून समोर आली. देशभर सगळीकडे या प्रती गंभीर प्रतिक्रिया उदयास आली. यातूनच बुद्धीन बुद्धिजीवी वर्ग उदयास आला. या वर्गाने आधुनिक भारतीय राष्ट्रवादाच्या इतिहासात निर्णायक भूमिका वटविली. या वर्गाने भारतीय समाजाला आधुनिक राष्ट्राच्या रूपात विकसित केले. देशामध्ये अनेक प्रगतिशील, सामाजिक, धार्मिक सुधारणावादी चळवळीला राबविले. हे प्रगतिशील बुद्धिजीवी आधुनिक भारताचे निर्माता होते.

**संदर्भग्रंथ :**


- S. P. Nanda, ‘Economic And Social History Of Modern India’, Anmol Publication Pvt. Ltd., New Delhi, 1919.
- डॉ. कैलाश खन्ना, ‘आधुनिक भारत का सामाजिक इतिहास’, अर्जुन पब्लिशींग हाऊस, नई दिल्ली, २००७.
- Bipan Chandra, ‘History of Modern India’, Orient Black Shivam, 2009.
- डॉ. आर. के. परुथी, ‘आधुनिक भारत, उपनिवेवाद, साम्राज्यवाद और राष्ट्रवाद’, अर्जुन पब्लिशींग हाऊस, नई दिल्ली, २०१८.
- डॉ. जयसिंग पवार, सौ. वसुधा पवार, ‘आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास’, विद्या प्रकाशन, नागपूर
- रश्मी पाठक, ‘भारत में अंग्रेजी राज’, अर्जुन पब्लिशींग हाऊस, नई दिल्ली, २००३.